**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ४**

दिनांक :- १२/०९/२०१२ वेळ :- १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. १२/०९/२०१२ रोजी दु. १२.०० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ४ | मा. भोंडवे मोरेश्वर महादू | सदस्य |
| ५. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ६. | मा. लोंढे गणेश नारायण | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील अश्विनी गजानन | सदस्य |
| १०. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| ११. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| १२. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १३. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १४. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १५. | मा. कदम सदगुरु महादेव | सदस्य |
| १६. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १७. | मा. कदम कैलास महादेव | सदस्य |
| १८. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १९. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |
| २०. | मा. पवार यमुनाताई रमणनाना | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता रामदास जाधव, मकरंद निकम, शरद जाधव, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत, लेखाधिकारी सुरेश आव्हाळे, उपअभियंता श्रीम एल.एस. बाबर, एम.एम. चव्हाण, एम. डी. पाटोदकर, एस.डी. वाघुंडे, डी. एन. गट्टूवार, व्ही.सी.काळे, व्ही.एन.देसले, श्रीम.मोमीन, सहा. आरोग्य अधिकारी आर. डी. भोकरे, सहा. उद्यान अधि. जी. आर. गोसावी, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

मागील सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले. तदनंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेतले.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

- वॉ.क्र. ४० मधील गंगानगर – भेळ चौकाच्या मागे एच.ए. ग्राऊंडच्या शेजारी दत्त मंदिराच्या समोर पत्र्याचे शेड अथवा निवारा करण्याबाबत
- वास्तु उद्योग येथील कै. मासुळकर यांच्या नावाची लोखंडी पाटी काढून ती एच.ए.च्या नेहरुनगरच्या मोठया रस्त्यालगत मासुळकर कॉलनीला जाणा-या रस्त्यावर सिमेंटची वेस तयार करुन मासुळकरांचे नावाची कमान तयार करण्याबाबत.
- खराळवाडी एच.ए. कॉलनी, वास्तु उद्योग, गंगानगर येथील ड्रेनेज लाईन जुन्या झाल्या आहेत त्या आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे अथवा नवीन ड्रेनेज लाईन टाकणे.
- एच.ए. कॉलनीतील रस्ते तसेच आरोग्य विषयक, उद्यान विषयक, विद्युत पोल बसविणेबाबतची, ड्रेनेज बाबतची कामे करावीत.
- कामगार नगर येथील जेष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्राचे जागेत जेष्ठ नागरीकांसाठी एक मोठा हॉल अथवा समाज मंदीर बांधून देणे.
- वरील विषयांस मान्यता देणे.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. ५२ ताथवडे, पुनावळे या भागामध्ये पिंपरी चिंचवड म.न.पा. ची शाळा आहे. ती शाळा बांधून बरीच वर्षे झाली आहेत. शाळा गावांतील रस्त्याला लागून आहे. या शाळेतील मुले वारंवार रस्त्यांवर ये-जा करतात.

तरी या ठिकाणी कोणताही अपघात घडू नये. यासाठी लवकरात लवकर या शाळेची सिमाभिंत बांधूणेस मान्यता देणे.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २० मधील बिजलीनगर येथे रेल्वे पादचारी पुलासमोर गिरीराज सोसायटी मागे, रेल्वे लाईनच्या बाजूला रोडजवळ मुतारी असून त्या मुतारीचा वापर होत नाही. तसेच त्याचे कनेक्शन ड्रेनेज लाईनला न जोडल्यामुळे साचणारा साठा तसाच राहून भरपूर दुर्गंधी पसरली आहे.

तसेच सदरचा रस्त्याने मोठया प्रमाणात महिला वर्ग मुलांना शाळेत सोडविण्यासाठी ये-जा करत असतात तसेच समोर सोसायटी आहे. त्यामुळे तेथील दुर्गंधीचा त्रास होत असतो तरी आपण तरी आपण सदरची मुतारी काढण्या संदर्भात ताबडतोब योग्य ती कारवाई करावी. सदर कार्यवाही सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सुरु करावी.

विषय क्र. ९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

दिशादर्शक नामफलक बसविणेबाबत.

प्रभाग क्र. ४० खराळवाडी येथील हापकिन कंपनी कॉर्नर येथे रस्त्याच्या दोन्ही बाजूला हापकिन कंपनीच्या नावांचा व यशवंतराव चव्हाण हॉस्पीटलच्या नावांचा दिशादर्शक बोर्ड लावावा. तसेच एच.ए.कंपनी व एच.ए. कॉलनी दिशादर्शक रस्त्याच्या दोन्ही बाजूस लावण्यात यावा. म्हणजे प्रवाशांना सोयीचे होणार आहे. सदर कार्यवाही सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता सुरु करावी.

विषय क्र. १० विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

महात्मा फुले स्मारकाजवळील मुतारीबाबत.

महात्मा फुले स्मारकाजवळील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारका जवळील मुतारी आहे त्या ठिकाणी पुर्ववत लावणे, कारण त्या जागेत अनेक कार्यक्रम होत असतात अनेक अनुयायी राज्यातून येत असतात त्यांच्या व स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार तेथेच मुतारीची सोय करावी. जेणेकरुन तेथे येणा-या नागरीकांची सोय होईल व तेथे येणारे लोक तेथील सोसायटीसमोर टॉयलेटसाठी जातात म्हणून मुतारी जेथे होती तिथेच असावी, महिलांसाठीही मुतारीची सोय करावी.

तसेच मुतारी कोणत्या कारणासाठी सदर ठिकाणाहून काढली त्याची चौकशी करावी.

विषय क्र. ११ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

रावेत प्रभागातील रस्ते व चौकास नावे देणे व फलक लावणेबाबत.

- रावेत बी.आर.टी. रस्त्यापासून ते म्हस्के वस्ती पर्यंत रस्त्यास कै. ह.भ.प. भालचंद्र धोंडू भोंडवे पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत म्हस्के वस्तीच्या पूर्व दिशेच्या लक्ष्मी नगरला जाणा-या डांबरी रस्त्यास कै. पांडुरंग महादू भोंडवे (पाटील) पथ हे नांव देण्यात यावे. त्याचप्रमाणे लक्ष्मीनगरची नामफलक लावणे.
- रावेत येथील गोविंद बाळा शेळके यांचे घराशेजारुन पेव्हींग ब्लॉकच्या रस्त्यास कै.रामचंद्र रंगोजी भोंडवे पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील दत्तात्रय यशवंत भोंडवे यांच्या घरापासून गांवठाणापर्यंत जाणा-या पेव्हींग ब्लॉक रस्त्यास कै. पुष्पाबाई मनोहर गुंजाळ पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील धर्मराज मंदिर ते पांडुरंग महादेव भोंडवे चौकापर्यंत जाणा-या रस्त्यास कै.रामचंद्र गोविंद पालेकर पथ हे नांव देण्यात यावे.
- देहूरोड – कात्रज बायपास रस्त्यापासून ते रावेत भोंडवे वस्तीपर्यंत जाणा-या रस्त्यास कै.सहादू कुशाबा भोंडवे पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत, भोंडवे वस्ती मधील श्री. बाळासाहेब गणपत भोंडवे यांच्या घराजवळ असणा-या चौकास कै. महादू गणपत गलांडे चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील भोंडवे वस्तीमधील माथाडी कामगार नेते श्री. मधुकर दत्तात्रय भोंडवे यांच्या घराजवळील चौकास कै. दत्तात्रय सिताराम भोंडवे चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील शेळके वस्तीवरील दत्त मंदिराच्या जवळील चौकास कै. शंकर बाळा शेळके चौक असे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील बी.आर.टी.रस्त्याच्याच गांवठाणाकडे जाणा-या रस्त्याच्या चौकास कै. सहादू हरी भोडवे (मा. सरपंच) चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील एम.आय.डी.सी. रस्त्यापासून (रेल्वे बोगदा) पश्चिमेला जाणा-या रस्त्यास सोनटक्के वस्ती आहे या रस्त्यास कै. पै. विष्णू गोविंद सोनटक्के पथ तसेच सोनटक्के वस्ती असा नामफलक लावावा.
- रावेत येथील गणपती मंदीर जवळील चौकास जय गणेश चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील बी. आर. टी. रस्त्यालगत तुपे वस्तीकडे जाणा-या रस्त्याच्या चौकास श्री कळमजाई माता चौक हे नांव देण्यात यावे.

विषय क्र. १२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

- प्रभाग क्र.२१ मधील एल्प्रो कंपनीसमोर (कामिनी हॉटेलसमोर) चौकातील मुतारी काढून चौक सुशोभित करण्यात यावा.

- पांढरकरनगरमधील स्त्रियांसाठीचे १० संडास ब्लॉक सुलभच्या धर्तीवर बांधण्यात यावेत.
- पांढरकरनगरमधील पुरुषांसाठीचे १० सीटचे संडास ब्लॉक सुलभच्या धर्तीवर बांधणे

विषय क्र. १३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

विकासनगर किवळे येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अधिकृत रिक्षा थांब्यास मान्यता मिळावी.

विषय क्र. १४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे कलम २०५ नुसार रस्ता घोषीत करणेबाबत.

ठराव क्र. ११. विषय क्र.१

दि.१२/०९/२०१२ विभाग:सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. ओव्हाळ शेखर अशोक अनुमोदक : मा. भोंडवे मोरेश्वर महादू

संदर्भ : मा. ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि. १६/८/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ५२ येथे आपल्या महापालिकेची शाळा माळवाडी येथे असून त्या शाळेला **वैकुंठवासी भिकोबा सोपान भुजबळ** असे नांव देणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १२. विषय क्र.२

दि.१२/०९/२०१२ विभाग:सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख अनुमोदक : मा. भोंडवे मोरेश्वर महादू

संदर्भ : मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख यांचे दि. १६/८/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड स्टेशनकडे जाणा-या उड्डाण पुलावर जाण्यासाठी असलेल्या जीन्याची दुरावस्था झालेली आहे. तसेच तीव्र चढण असल्यामुळे प्रौढ नागरीकांस तेथून चढणे उतरणे अवघड होत आहे.

तसेच लोकमान्य हॉस्पीटलकडून सुदर्शन नगरकडे जाणा-या रस्त्यावरील बोगदयाच्या डाव्या बाजूला मोकळी जागा असून त्या जागेत सध्या खूप राडारोडा पडलेला असतो. नागरीकांच्या मागणीनुसार जर त्या जागेची साफसफाई करुन नवीन जीना बांधण्यात आला तर नागरीकांना त्याचा फायदा होईल.या दोन्ही जागांची पाहणी करुन आवश्यक ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १३. विषय क्र.३

दि.१२/०९/२०१२ विभाग:सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोंडवे मोरेश्वर महादू अनुमोदक: मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

संदर्भ : मा. भोंडवे मोरेश्वर महादू यांचे दि. ८/८/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडीमधील रावेत प्राधिकरण सेक्टर २९ मधील उदयानास **संत ज्ञानेश्वर महाराज** उदयान रावेत असे नामकरण करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १४. विषय क्र.४

दि.१२/०९/२०१२ विभाग:सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोंडवे मोरेश्वर महादू अनुमोदक: मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

संदर्भ : मा. भोंडवे मोरेश्वर महादू यांचे दि. ८/८/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

- प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडीमधील रावेत येथील शिंदे वस्ती एम.आय.डी.सी. रोड गणपती मंदीर ते श्री. विजय भोंडवे यांचे घरापर्यंतच्या रस्त्याला **कै. विठ्ठल आत्माराम भोंडवे (मुंबईवाला)** पथ असे नांव देण्यात यावे.
- शिंदे वस्ती एम.आय.डी.सी. रोड ते भालचंद्र भोंडवे यांचे घरापर्यंत रस्त्याला **ह.भ.प. भालचंद्र धोंडूजी भोंडवे** पथ असे नांमकरण करणेत यावे.
- रावेत गावांतील रावेत स्मशानभूमी ते हनुमान मंदीरापर्यंत रस्त्याला **कै. पै. विष्णू दादा सोनटक्के** असे नांव देणेत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १५. विषय क्र.५

दि.१२/०९/२०१२ विभाग:सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोंडवे मोरेश्वर महादू अनुमोदक: मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव

संदर्भ : मा. मा. भोंडवे मोरेश्वर महादू यांचे दि. ८/८/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

- प्रभाग क्र. १९ वाल्हेकरवाडी येथील म.न.पा. शाळेलगत पश्चिमेला उजवी बाजुस **कै. मारुती दादु वाल्हेकर** कॉलनी
- तसेच भोंडवे वस्ती रावेत वाल्हेकरवाडी रस्त्यास **कै. मैनाबाई शंकरराव वाल्हेकर चौक**
- तसेच मेन चौक वाल्हेकरवाडी रावेत रोड चौकात उजवीकडील चौकास **कै. दादु रामजी वाल्हेकर चौक** याप्रमाणे नामकरण करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १६ विषय क्र.६

दि.१२/०९/२०१२ विभाग :सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. पानसरे अमिना मोहंम्मद अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल

संदर्भ : मा. पानसरे अमिना मोहंम्मद यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

- वॉ.क्र. ४० मधील गंगानगर – भेळ चौकाच्या मागे एच.ए. ग्राऊंडच्या शेजारी दत्त मंदिराच्या समोर पत्र्याचे शेड अथवा निवारा करण्याबाबत
- वास्तु उद्योग येथील कै. मासुळकर यांच्या नावाची लोखंडी पाटी काढून ती एच.ए.च्या नेहरुनगरच्या मोठया रस्त्यालगत मासुळकर कॉलनीला जाणा-या रस्त्यावर सिमेंटची वेस तयार करुन मासुळकरांचे नावाची कमान तयार करण्याबाबत.
- खराळवाडी एच.ए. कॉलनी, वास्तु उद्योग, गंगानगर येथील ड्रेनेज लाईन जुन्या झाल्या आहेत त्या आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे अथवा नवीन ड्रेनेज लाईन टाकणे.
- एच.ए. कॉलनीतील रस्ते तसेच आरोग्य विषयक, उद्यान विषयक, विद्युत पोल बसविणेबाबतची, ड्रेनेज बाबतची कामे करावीत.
- कामगार नगर येथील जेष्ठ नागरीकांच्या विरंगुळा केंद्राचे जागेत जेष्ठ नागरीकांसाठी एक मोठा हॉल अथवा समाज मंदीर बांधून देणे.
- वरील विषयांस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १७ विषय क्र.७
दि.१२/०९/२०१२ विभाग :सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. ओव्हाळ शेखर अशोक अनुमोदक: मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव
संदर्भ : मा. ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ५२ ताथवडे, पुनावळे या भागामध्ये पिंपरी चिंचवड म.न.पा. ची शाळा आहे. ती शाळा बांधून बरीच वर्षे झाली आहेत. शाळा गावांतील रस्त्याला लागून आहे. या शाळेतील मुले वारंवार रस्त्यांवर ये-जा करतात.

तरी या ठिकाणी कोणताही अपघात घडू नये. यासाठी लवकरात लवकर या शाळेची सिमाभिंत बांधूणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १८ विषय क्र.८
दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक: मा. लोंढे गणेश नारायण
संदर्भ : मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २० मधील बिजलीनगर येथे रेल्वे पादचारी पुलासमोर गिरीराज सोसायटी मागे, रेल्वे लाईनच्या बाजूला रोडजवळ मुतारी असून त्या मुतारीचा वापर होत नाही. तसेच त्याचे कनेक्शन ड्रेनेज लाईनला न जोडल्यामुळे साचणारा साठा तसाच राहून भरपूर दुर्गंधी पसरली आहे.

सदरचे रस्त्याने मोठया प्रमाणात महिला वर्ग मुलांना शाळेत सोडविण्यासाठी ये-जा करत असतात तसेच समोर सोसायटी आहे. त्यामुळे तेथील रहिवाशांना दुर्गंधीचा त्रास होत असतो सदरची मुतारी काढण्या संदर्भात कार्यवाही कराणेस तसेच सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. १९ विषय क्र.९
दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. कदम सदगुरु महादेव अनुमोदक: मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख
संदर्भ : मा. कदम सदगुरु महादेव यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ४० खराळवाडी येथील हापकिन कंपनी कॉर्नर येथे नागरिकांचे सोयीसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला हापकिन कंपनीच्या नावांचा व यशवंतराव चव्हाण हॉस्पीटलच्या नावांचा दिशादर्शक बोर्ड लावणे व एच.ए.कंपनी व एच.ए. कॉलनी दिशादर्शक रस्त्याच्या दोन्ही बाजूस लावण्यास तसेच सदर कार्यवाही सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २० विषय क्र.१०
दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय
सुचक : मा. मंचरकर गिता सुशिल अनुमोदक: मा. कदम कैलास महादेव

संदर्भ : मा. मंचरकर गिता सुशिल यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

महात्मा फुले स्मारकाजवळील मुतारीबाबत.

महात्मा फुले स्मारकाजवळील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारका जवळील मुतारी आहे त्या ठिकाणी पुर्ववत लावणे, कारण त्या जागेत अनेक कार्यक्रम होत असतात अनेक अनुयायी राज्यातून येत असतात त्यांच्या व स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार तेथेच मुतारी लावावी. जेणेकरुन तेथे येणा-या नागरीकांची सोय होईल व तेथे येणारे लोक तेथील सोसायटीसमोर टॉयलेटसाठी जातात म्हणून मुतारी जेथे होती तिथेच पुन्हा मुतारीची सोय करणेस व महिलांसाठीही मुतारीची सोय करणेस तसेच मुतारी कोणत्या कारणासाठी काढली गेली त्याची चौकशी कराणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २१ विषय क्र.११

दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा.चिंचवडेपाटील अश्विनी गजानन

संदर्भ : मा. भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

सन्मा. सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

रावेत प्रभागातील रस्ते व चौकास नावे देणे व फलक लावणेबाबत.

- रावेत बी.आर.टी. रस्त्यापासून ते म्हस्के वस्ती पर्यंत रस्त्यास कै. ह.भ.प. भालचंद्र धोंडू भोंडवे पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत म्हस्के वस्तीच्या पूर्व दिशेच्या लक्ष्मी नगरला जाणा-या डांबरी रस्त्यास कै. पांडुरंग महादू भोंडवे (पाटील) पथ हे नांव देण्यात यावे. त्याचप्रमाणे लक्ष्मीनगरची नामफलक लावणे.
- रावेत येथील गोविंद बाळा शेळके यांचे घराशेजारुन पेव्हीन ब्लॉकच्या रस्त्यास कै.रामचंद्र रंगोजी भोंडवे पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील दत्तात्रय यशवंत भोंडवे यांच्या घरापासून गांवठाणापर्यंत जाणा-या पेव्हीन ब्लॉक रस्त्यास कै. पुष्पाबाई मनोहर गुंजाळ पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील धर्मराज मंदिर ते पांडुरंग महादेव भोंडवे चौकापर्यंत जाणा-या रस्त्यास कै.रामचंद्र गोविंद पालेकर पथ हे नांव देण्यात यावे.
- देहूरोड – कात्रज बायपास रस्त्यापासून ते रावेत भोंडवे वस्तीपर्यंत जाणा-या रस्त्यास कै.सहादू कुशाबा भोंडवे पथ हे नांव देण्यात यावे.
- रावेत, भोंडवे वस्ती मधील श्री. बाळासाहेब गणपत भोंडवे यांच्या घराजवळ असणा-या चौकास कै. महादू गणपत गलांडे चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील भोंडवे वस्तीमधील माथाडी कामगार नेते श्री. मधुकर दत्तात्रय भोंडवे यांच्या घराजवळील चौकास कै. दत्तात्रय सिताराम भोंडवे चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील शेळके वस्तीवरील दत्त मंदिराच्या जवळील चौकास कै. शंकर बाळा शेळके चौक असे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील बी.आर.टी.रस्त्याच्याच गांवठाणाकडे जाणा-या रस्त्याच्या चौकास कै. सहादू हरी भोडवे (मा. सरपंच) चौक हे नांव देण्यात यावे.
- रावेत येथील एम.आय.डी.सी. रस्त्यापासून (रेल्वे बोगदा) पश्चिमेला जाणा-या रस्त्यास सोनटक्के वस्ती आहे या रस्त्यास कै. पै. विष्णू गोविंद सोनटक्के पथ तसेच सोनटक्के वस्ती असा नामफलक लावावा.
- रावेत येथील गणपती मंदीर जवळील चौकास जय गणेश चौक हे नांव देण्यात यावे.

- रावेत येथील बी. आर. टी. रस्त्यालगत तुपे वस्तीकडे जाणा-या रस्त्याच्या चौकास श्री कळमजाई माता चौक हे नांव देण्यात यावे.
- वरील विषयांस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २२ विषय क्र.१२

दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. लोंढे गणेश नारायण

संदर्भ : मा. शमीम पठाण यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

- प्रभाग क्र.२१ मधील एल्प्रो कंपनीसमोर (कामिनी हॉटेलसमोर) चौकातील मुतारी काढून चौक सुशोभित करणेत यावा.
- पांढरकरनगरमधील स्त्रियांसाठीचे १० संडास ब्लॉक सुलभच्या धर्तीवर बांधणेस व पांढरकरनगरमधील पुरुषांसाठीचे १० सीटचे संडास ब्लॉक सुलभच्या धर्तीवर बांधणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २३ विषय क्र.१३

दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. नेटके सुमन राजेंद्र अनुमोदक: मा. शमीम पठाण

संदर्भ : मा. नेटके सुमन राजेंद्र यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

विकासनगर किवळे येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौकात अधिकृत रिक्षा थांब्यास मान्यता मिळावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र. २४ विषय क्र.१४

दि.१२/०९/२०१२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

सुचक : मा. भोंडवे मोरेश्वर महादू अनुमोदक: मा. नेटके सुमन राजेंद्र

संदर्भ : मा. भोंडवे मोरेश्वर महादू यांचे दि. १२/०९/२०१२ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.१९, वाल्हेकरवाडी प्रभागातील मौजे रावेत येथील सर्वे क्र. ११०/१ मधील रहिवास विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता आहे. सदर मिळकतींसाठी १५ फुट रुंदीचा खाजगी ले-आऊटमधील रस्ता असून सदर ठिकाणाहून जवळच्या म.न.पा. मंजूर आराखडयातील १८.० मीटर रुंदीच्या डी.पी. रस्त्यापर्यंत जाण्यासाठी पोहच रस्ता नाही. सदर मिळकतधारकांसाठी अन्य कोणताही रस्ता नसल्याने सोबतच्या नकाशाप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये विकास आराखडया व्यतिरीक्त (Non D.P.) रस्ता घोषीत करणे आवश्यक आहे.

तरी मौजे रावेत येथील एस. बी. पाटील पब्लीक स्कूल समोरील १८.० मीटर डी.पी. रस्त्यापासून स. नं. १०९/२ व ११०/१ यांच्या खाजगी ले-आउटमध्ये असलेल्या रस्त्यांना जोडणारा रस्ता विकास आराखडयाव्यतिरिक्त (Non D.P.) रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषीत करण्याची कार्यवाही करणेस तसेच सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर कार्यवाही होणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा झाली

मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव, मा.शमीम पठाण –

सर्वच सन्मा. नगरसदस्यांचे वतीने असे सूचित करणेत येते की, ब प्रभागांतर्गत स्थापत्य/विद्युत/पा.पुरवठा/जलनि:सारण/आरोग्य विषयक चालू असलेल्या व चालू होणा-या कामांबाबत स्थानिक नगरसदस्यांना विश्वासात घेऊन त्यांचेशी समन्वय साधून काम करणेत यावे.

मा. साळुंके सविता सुरेश, मा. ओव्हाळ शेखर अशोक, मा. पालांडे सुजाता सुनिल –

प्रभागामध्ये सफाईचे काम करणा-या कर्मचा-यांची यादी संबंधित सन्मा. नगरसदस्यांना देणेत यावी. जितके कर्मचारी यादीमध्ये नमूद आहेत तितके कर्मचारी प्रत्यक्षात काम करतात का याबाबत वरिष्ठांनी शहानिशा करावी.

मा. पानसरे अमिना मोहंम्मद -

प्रभाग क्र.४० मध्ये कमी दाबाने पाणी येत आहे तरी याकडे सबंधित अधिकारी यांनी लक्ष घालावे.

मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख –

प्र.क्र.२४ मध्ये पेव्हींग ब्लॉक बसवावेत तसेच आरोग्य विषयक कामांकडे लक्ष देण्याची गरज आहे.

मा. कदम कैलास महादेव –

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोर असलेली मुतारी कोणाच्या सांगण्यावरुन व कोणत्या कारणासाठी काढण्यात आली याची चौकशी करुन पुढील सभेत त्याचा संबंधितांनी खुलासा करावा.

मा.प्रभाग अधिकारी श्री अजीज कारचे –

ब प्रभागांतर्गत चालू असलेल्या आधार कार्ड (U.I.D.) योजनेची माहिती उपस्थितांना दिली. तसेच सदरबाबतची माहिती महानगरपालिकेच्या वेबसाईटवरही प्रसिध्द केली असलेबाबत स्पष्ट केले.

जनगणनेचे कामकाज पुर्ण झालेले असून याबाबत काही हरकती असतील तर त्या देणेबाबत निवेदनाव्दारे नागरिकांना आवाहन करणेत आलेले आहे.

सन्मा. नगरसदस्यांचे मागणीवरुन संबंधित विभागाने ठेकेदारांची यादी उपलब्ध करुन द्यावी. अशा सुचना दिल्या.

सहीxxx
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिति, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/२४३/२०१२, दि.२८/०९/२०१२